# पीक उत्पादन जास्त खर्च मात्र कमी; कोणतं नियोजन देईल याची हमी?



**डॉ. दीपाली कांबळे**
विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)
**सचिनकुमार सोमवंशी**
कृषी विज्ञान केंद्र, बदनापूर
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी



> जमिनीचा प्रकार, हवामान, स्थानिक मागणी व बियाण्याची उपलब्धता यांचा विचार करून पीक व पीक पद्धतीची निवड केली पाहिजे. एखाद्या पिकाचा एखादा वाण एखाद्या क्षेत्रात चांगला आढळून येतो. ज्याची उत्पादन क्षमता बरेच दिवस टिकून राहते अशाच वाणाची निवड करावी. दर्जेदार व प्रमाणित बियाणेच पेरणीसाठी वापरले पाहिजे. अशी तजवीज केल्यास आपले पीक निश्चितच नफा मिळवून देईल.

पिकाची उत्पादकता आणि स्थिरता राखण्यासाठी उपलब्ध पाऊस, जमीन व हवामानाचा वापर योग्यप्रकारे केला पाहिजे. खरीप व रब्बी हंगामात पिकांना अतिवृष्टी व अनावृष्टी अशा दोन्ही स्थितींना सामोरे जावे लागते. रब्बी हंगामात बहुतेक करून पिकांना मातीतील उपलब्ध ओलाव्यावर अवलंबून राहावे लागते. कोरडवाहू आणि अवर्षणप्रवण क्षेत्रात पावसाचे स्वरुप फार महत्त्वाचे आहे. कारण याच्याशी निगडित अडचणींमुळे पिकाची उत्पादकता टिकवून ठेवणे अवघड जाते. काही बिगरखर्चिक बाबींचा वापर केल्यास अशा क्षेत्रात कमी खर्चात पिकाची उत्पादकता कायम ठेवता येईल आणि शेतीतून निघणारे एकूण निव्वळ उत्पन्न वाढेल.

**वेळेवर पेरणी** : शेतकरी पिकाची पेरणी करणारच असतो परंतु पडलेला पाऊस पिकाची गरज व जमिनीचा प्रकार यानुसार विचार करून कोणते पीक अगोदर पेरावे हे ठरविले पाहिजे. ज्वारी, कापूस, मूग, उडीद यासारखी पिके अगोदर पेरणे आवश्यक आहे. तर तूर, बाजरी, मका, सोयाबीन, धने यासारखी पिके थोडी उशिरा पेरली तरी चालतात. कारण ज्वारीच्या पेरणीला उशीर झाल्यास त्यावर खोडमाशींचा प्रादुर्भाव होऊ शकतो. तणांचे नियंत्रण व्यवस्थित करता येते.

**धूळ पेरणी** : हमखास पावसाच्या भागात हंगामी पाऊस सुरु होण्याअगोदर १० ते १५ दिवस अगोदर धूळ पेरणी केल्यास फायद्याचे दिसून आले आहे. साधारण १५% अधिकचे उत्पादन धूळ पेरणीमुळे पिकाच्या सुरुवातीच्या काळात वाढ चांगली होऊन पीक काढणीस लवकर तयार होते. ज्यामुळे दुबार पीक वेळेवर घेणे सहज शक्य होते. बऱ्याच वेळा धूळ पेरणीमुळे पिकाच्या उत्तरार्धात येणाऱ्या अवर्षणामुळे होणारे नुकसान टाळता येते.

**खोल नांगरणी** : खोल नांगरणीमुळे पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरण्यास आणि पृष्ठभागावरून वाहणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होऊन जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते. जमिनीत योग्य ओलावा असताना नांगरणी केल्यास ती सोपी जाते आणि सहज करता येते.

### पेरणीच्या योग्य पद्धती व अवजारांचा वापर

दोन चाडी तिफण किंवा ट्रॅक्टरवर चालणारी पेरणी यंत्रे वापरून बियाणे व खत एकाच वेळी पाहिजे त्या अंतरावर पेरल्यास त्याचा कापूस, तूर, ज्वारी, भुईमूग, एरंडी या पिकांच्या उत्पादन वाढीवर चांगला परिणाम दिसून आला आहे. हलक्या व मध्यम उताराच्या जमिनीत पेरणीसाठी मोग्याचा वापर केल्यास वेळेवर पेरणी करणे सहज शक्य होते आणि त्याचा पीक उत्पादनावर चांगला परिणाम दिसून येतो. बऱ्याच वेळा जमीन तयार करण्यास व नंतर पेरणीस वेळ वाया न घालवता औताच्या मागे मोगा लावून दोन्ही कामे एकदाच पूर्ण केली जातात आणि त्याचा सुरुवातीच्या पावसाचा पीक वाढीसाठी चांगला उपयोग होतो.

### पीक आणि वाणाची निवड

जमिनीचा प्रकार, हवामान, स्थानिक मागणी व बियाण्याची उपलब्धता यांचा विचार करून पीक व पीक पद्धतीची निवड केली पाहिजे. एखाद्या पिकाचा एखादा वाण एखाद्या क्षेत्रात चांगला आढळून येतो. ज्याची उत्पादन क्षमता बरेच दिवस टिकून राहते अशाच वाणाची निवड करावी. दर्जेदार व प्रमाणित बियाणेच पेरणीसाठी वापरले पाहिजे.

### पीक पद्धतीची निवड

उपलब्ध परिस्थितीचा विचार करून योग्य पीक पद्धतीची निवड करावी.

**आंतरपीक पध्दती** : पावसाच्या लहरीपणाचा परिणाम कमी करण्यासाठी एकपीक पद्धतीपेक्षा आंतरपीक पद्धतीचा निश्चितच फायदा होतो. यासाठी वेगळा खर्च करावा लागत नाही. परंतु पीक हातचे जाण्याची जोखीम कमी करता येते.

पीक आधारित आंतरपीक पद्धती जसे ज्वारी + तूर (४:२), कापूस + तूर (४:१), कापूस + उडिद (१:४), कापूस + सोयाबीन (१:४) किंवा जमिनीच्या प्रकारानुसार

| | |
|---|---|
| हलक्या जमिनीसाठी | बाजरी + तूर (६:२) |
| मध्यम जमिनीसाठी | ज्वारी + तूर (४:२) |
| भारी जमिनीसाठी | कापूस + तूर (४:१) |

अशा पीक पद्धतीची निवड केली पाहिजे.

**आपत्कालीन पीक पध्दती** : पावसाचे स्वरुप दरवर्षी सारखेच नसते. पावसाच्या स्वरुपाच्या अनुरूप पीक पध्दती किंवा पीक निवडले पाहिजे.

**आपत्कालीन परिस्थिती घ्यावयाची पिके**

| पावसाची सुरुवात | कोणती पिके घेता येतील | कोणती पिके घेऊ नयेत |
|---|---|---|
| **खरीप** | | |
| जूनअखेर | सर्व पिके घेता येतील | – |
| जुलै १५ पर्यंत | बाजरी, तीळ, तूर | कापूस, ज्वारी |
| जुलै ३० पर्यंत | तीळ, तूर, धने, एरंडी | मूग, उडीद, सोयाबीन |
| ऑगस्ट १५पर्यंत | सोयाबीन | सूर्यफूल |
| **रब्बी** | | |
| सप्टेंबर १५पर्यंत | ज्वारी | गहू, करडई |
| ऑक्टोबर | ज्वारी, करडई | हरभरा, गहू |
| नोव्हेंबर | गहू, हरभरा | ज्वारी |